

# कधी सरस सरस

# कधी कळस कळस

- पंकज घारे



# ट्रेकिंगिरी
## कधी सरस सरस कधी कळस कळस

लेखक:  पंकज घारे
mr_ghare@yahoo.co.in
ph. : 9819663630
ई पुस्तक डिझाईन : पंकज घारे

प्रकाशक : ई-साहित्य प्रतिष्ठान
मो.  ९८६९९६७४८२०
वेबसाईट : www. esahity. com
ईमेल: esahity@gmail. com

©esahity Pratishthan® 2013

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध


- हे ई पुस्तक आपले वाचून झाल्यावर आपण फ़ॉरवर्ड करू शकता.
- वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.


साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशविदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. ब्ल्यु टुथद्वारे देता घेता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे.

देव खरंच माणसात आहे ?....का ही सुद्धा अंधश्रद्धा आहे ?

डॉ. नरेंद्र दाभोळकर

यांना समर्पित

प्रकाशन दिवस: सर्वपित्री अमावस्या

साहित्य प्रतिष्ठान

# सरसगड

# मैत्रीदिन @ सरसगड





मैत्रीदिन....खरंतर रोजच असतो. पण ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यातच तो का साजरा करतात? खरंतर मित्रांशिवाय एकही दिवस जात नाही; पण या दिवशी मात्र आवर्जून सदिच्छा दिल्या जातात. त्यातही मित्रांचे प्रकार अनेक. काहींचे बालमित्र, वर्गमित्र, कॉलेजचे मित्र, आता तर फेसबुक फ्रेंड्स, प्रवासातले मित्र आणि चक्क व्यावसायिक मित्र! काहीजण मात्र निराळे... ते म्हणजे सर्पमित्र, पक्षिमित्र, निसर्गमित्र, दुर्गमित्र, विश्वमित्र!!!... आम्हीदेखील त्यातलेच. त्यामुळे मैत्रीदिनी गडावर जायचे ठरले.

पेठचा किल्ला (कोथळीगड) पाहण्यासाठी कर्जत स्थानकावर बराच वेळ ‘आंबिवली’ येथे जाणाऱ्या बसची वाट पाहून कंटाळा आला; पण ‘पाली’ला जाणारी बस बराच वेळ उभी असलेली दिसली. म्हणून ऐनवेळी बेत बदलून ‘सरसगड’ येथे जायचे ठरले आणि तेव्हा कुठे ती बस सुरू झाली.



मित्रांचे मित्र, दुर्गमित्र वाटेत माणिकगडासाठी उतरले. नाहीतर दोनाचे चार (ट्रेकर्स) झाले असते. खड्डेदार रस्त्यांमधून जमेल त्या वेगाने बस धावू लागली. बनवलेल्या मुख्य रस्त्यापेक्षा दोन्ही बाजूला असलेले नैसर्गिक हिरवेगार मैदान बरेच सपाट होते. हिरव्या रंगाच्या विविध छटांमध्ये रंगीत गायी आणि काळ्या म्हशी दिसू लागल्या. दोन-अडीच तासांनी बल्लाळेश्वर मंदिराजवळ बस थांबली. सरसगडाची सुरुवातच मुळात हास्यरसाने झाली, जेंव्हा गावातल्या युवकांना “गडाकडे जाणारी वाट कोणती ?.....सरसगडाकडे ?” असे विचारल्यावर त्यांनी “काहीही कल्पना नाही” असे उत्तर दिले.







बल्लाळेश्वर मंदिराच्या बाजूने डांबरी रस्त्याने चालू लागलो. पुढे तो एका थोड्या मुख्य रस्त्याला मिळतो आणि सरसगडाचा नकाशा आणि माहिती वाचायला मिळते. नकाशाशेजारील लाल रस्त्यावरून खरा ट्रेक सुरू झाला. वाटेत अनेक उपवाटा होत्याच, पण तीव्र चढाव असलेली वाट निवडत होतो. पावसाळ्यातली वाट थोडी निसरडी होती. दमछाक होउन थोड्या वेळातच चेहऱ्यावर 'कारुण्य' दिसू लागले. शहरातल्या आळसाचा विरह झाला.

अगदी थोड्या वेळातच उंच झाडे आणि झाडी संपली आणि बारीक गवत असलेले तीव्र उतराचेच मैदान सुरू झाले आणि सरसगडाच्या लगतच्या दोन बुरूजांमधील चिंचोळ्या जागेतील पायऱ्या दिसू लागल्या. आजूबाजूची सृष्टी शृंगाररसात चिंब भिजलेली! जिथे माणसाने पोहोचणे कठीण ती जागा स्वच्छ हिरवी... ढगांची सावली पडल्याने काही ठिकाणी हिरवा रंग गडद झालेला...





पायवाटेने जाताना आजूबाजूला व्यवस्थित जागा असली तरी गवतावर पाय ठेवून खराब करणे चुकीचे वाटले. आपल्या मातीला कितीतरी घट्ट धरून रहावे हे माणसाने गवताकडून शिकावे. पुन्हा एकदा बिलगणाऱ्या झाडीतून वाट काढल्यानंतर माळरानावर आलो. वीस ते पंचवीस जणांचा गट या गडाला ‘सुधागड’ समजून इथपर्यंत आला होता. सुधागड इथून १० किमी अंतरावर आहे.

सोपी चढण चढल्यानंतर वाटेत पुनःपुन्हा आराम करण्यासाठी ऐसपैस जागा मिळते आणि सभोवतालचे निसर्गसौंदर्य अनुभवत आपण पुढचे आव्हान स्विकारण्यास तयार होतो. एका मोठ्या शिळेचा आधार घेत त्याच शिळेत खोदलेल्या पायऱ्यांच्या आकाराचे ठसे, आपले चढणे खूपच सोपे करतात. जसे उंच जावे तशी गवताची उंचीसुद्धा वाढलेली दिसते. आपले बूट पूर्ण झाकले जातील अशा रुतलेल्या पायवाटेतून चालताना अधूनमधून दगडांचा आधार घ्यावाच लागतो.



मध्येच एका सपाट जागेवर उभे राहून इथपर्यंतची पूर्ण पायवाट आणि कुठे काय चालले आहे ते अजिबात त्रास न घेता पाहता येते. हा किल्ला मुख्यतः टेहळणीसाठी वापरला जातो हे लक्षात आले. डाव्या बाजूच्या चौकोनी भुयारात कोपर जमिनीवर टेकवत रांगत रांगत शिरण्याचा प्रयत्न केला. टॉर्चने अंधार सोडून काहीही दाखवले नाही. शिवाय श्वास घेतानाही त्रास होत होता. तेथूनच उलटा रांगत परत बाहेर येऊन कातळात तयार केलेल्या पायऱ्यांपाशी उभा राहिलो.





दुरुन दोन बुरुजांमध्ये दिसलेला अरुंद भाग वर जाताना अधिकच अरुंद होत जातो. या अरुंद भागाच्या अर्ध्या भागात असमान रुंदीच्या पायऱ्या आहेत तर अर्ध्या भागातून खाली झरा वाहत होता. एक पायरी चढताना पाऊल दुसऱ्या पायाच्या गुडघ्याजवळ, कधी वर तर कधी खाली ठेवावे लागते. असे करताना पूर्णपणे पुढे वाकून सावकाश चालावे.

ई साहित्य प्रतिष्ठान



काही पायऱ्या तुटलेल्या तर काही पायऱ्या ओबडधोबड आहेत. पाऊस पडत नसला तरी पायऱ्यांवर शेवाळ होते. पायऱ्याही गुळगुळीत होत्या. आधार घेण्यासाठी नकळतच वापरला जाणारा डाव्या हाताचा डोंगर ओलसर त्याची फारशी मदत चढताना झाली नाही (पण किमान त्या बाजूला आपण पडणार नाही याची खात्री देतो.







पायऱ्यांच्या उजवीकडचा डोंगर आणि त्याला पाहताना आपसूकच मागे आणि खाली दिसणारी दरी या ठिकाणी 'रौद्र' रूप म्हणजे काय याचा अनुभव देते. पायऱ्या संपता संपता उजवीकडे दरड कोसळणे थांबवण्यासाठी बांधकाम केलेले दिसते, जे फार गरजेचे आहे. कारण बुरुज तसेच डोंगरामधील चिरा, चिरांमधील गवत, वाहणाऱ्या झऱ्याचे पाणी यामुळे कधी मोठे दगड निसटतील हे सांगता येत नाही.

शिवाय डोंगराच्या दोन सोंडांमधील जागा वगळता संपूर्ण वाटेत या दगडांना अडवेल असे झाड किंवा मोठा दगड नाही. या उलट तीव्र उतार वेगही वाढवेल. गडाची काळजी तर आहेच पण पायथ्याशी असलेली घरे आणि मंदीर यांनाही धोका उदभवू शकतो अशी भीती वाटते. पायऱ्या चढताना वाटेत थांबलो तर मागून येणाऱ्यांना आणि वरून खाली येणाऱ्यांना त्रास होतो. त्यामुळे एकदा चढले की चढतच राहावे लागते. माकडाप्रमाणे सर्वांचे चढणे संपते आणि भटकणाऱ्यांची दिंडी डावीकडे असणाऱ्या दिंडी दरवाजापाशी पांगते.



साहित्य प्रतिष्ठान



दिंडी दरवाज्याची भिंत डाव्या बुरुजाच्या मागेच असल्याने जोरदार हवेचा मारा सरळ दरवाजावर न आदळता तो बुरुजावर आदळतो आणि दरवाजाचे रक्षण होते. शिवाय सर्व पायऱ्या चढून आल्याशिवाय दरवाजा दिसत नाही.

दरवाजातून आत शिरताच समोर पहारेकऱ्यांसाठी देवड्या दिसतात. आपणही इथे मुक्काम करून काही काळ पहारेकरी म्हणून मिरवू शकतो. पण इथेही आतमध्ये काहींनी स्वतःची नावे लिहून बीभत्स मैत्री दाखवलेली दिसते. मैत्रीदिनी खरंतर मित्रांच्या हातांवर, जमेल तिथे नाव लिहिल्याचे पाहिले असेलच. पण ‘दुर्ग’ या मित्राचे खरे रूप खराब करणे योग्य नाही.





साहित्य प्रतिष्ठान







उजवीकडे काही पायऱ्या चढून आल्यास आपणच चढलेला मार्ग फारच 'अदभूत' दिसतो. गडाची तटबंदीही दिसते. कडेकडेने वळसा घेतल्यानंतर तटालाच जोडून पायऱ्या आहेत, जेथून

फक्त बालेकिल्ल्याचा अरुंद भाग दिसतो. अगदी काही अंतरावर असलेल्या टाक्यातील पाणी खराब आहे. त्याला जोडूनच एक छोटीशी गुहा आहे. आणखी काही अंतरावर असलेल्या पाण्याच्या टाक्यातील पाणी कमालीचे स्वच्छ आणि गोड आहे. आपण जे पाणी घरी पितो त्यापेक्षा कितीतरी पटीने मधुर !



गोड पाण्याचे गोडवे गात पुढे चालू लागतो. वाटेत एका छोट्या गुहेच्या वरच्या कडेमुळे अनावधानाने डोक्याला टक्कर लागू शकते. अगदी तेथेच चालण्यासाठी जागा फारच अरुंद असल्याने डाव्या बाजूला दरीत पडण्याचा धोका आहे. पुन्हा एक चढण चढताना दगडांच्या खाच्यांमध्ये आधी हातांची बोटे अडकवत शरीर वर आणून लगेचच तळहातावर जोर देऊन कसरत करत यावे लागते. पुन्हा उजवीकडे वळसा घालून शेवटचा टप्पा, झेंडा असलेला बुरुज दिसतो. पण तिथपर्यंत पोहचण्यासाठी सुरवातीला कौशल्य पणाला लागते. संपूर्ण वाटेत सोपी, मध्यम आणि कठीण चढण टप्प्या टप्प्याने अनुभवता येते. त्यामुळे नव्या ट्रेकर्ससाठी हा गड उत्तम !





साहित्य प्रतिष्ठान



शेवटची ही चढण चढल्यानंतर डाव्या बाजूला असलेल्या टाक्यात खूपच कमी पाणी असून त्याच्या पलीकडे काही पायऱ्या आहेत. उजव्या बाजूला झेंड्याशेजारील जागेत बसून अगदी सुरवातीपासूनच दिसणारे तीन डोंगर, सुधागड, लांबलचक अंबा नदी असा विस्तीर्ण परिसर दिसतो. इथून पुढे सपाट जागेवरच्या वाटाच आपल्याला पूर्ण गड फिरवतात.



एका उद्ध्वस्त वास्तूनंतर थोडे उतरून केदारेश्वराचे मंदीर दिसते. मंदिराशेजारीच असलेला तलाव पूर्णपणे हिरवा आहे. पाणी पिणे सोडाच तिकडे पहावलेही जात नाही. मंदिरातच काही दगडी शिल्पे आहेत. माथ्यावर पोहोचेपर्यंत आणि पोहोचल्यावर वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेले भटके एकत्र झाले. गडावरच्या टाक्यातले पाणी स्वतः पिऊन दाखवल्यानंतर आणि थोडी चव चाखल्यानंतर ते पिण्यायोग्य आहे असे मान्य केले.

ई साहित्य प्रतिष्ठान





ट्रेकिंगमुळे माणसे जोडली जाऊन ते मित्र होतात हे खरे. गड उतरताना समोर दिसणाऱ्या भयानक उतारामुळे आपोआपच सर्वजण काळजी घेत उतरतात. कठीण टप्पे, पाण्याच्या टाक्या, दिंडी दरवाजा आणि घसरून पडण्याची भीती दाखवणाऱ्या पायऱ्या 'वीर'तेने पार करून गवताळ मैदानावर आल्यावर हायसे वाटते. गडावर जास्त झाडे नाहीत, त्यामुळे पक्ष्यांचा अजिबात आवाज नाही.

एका रसाळ अनुभवानंतर दमलेले मन शांत होते.





साहित्य प्रतिष्ठान

# कळसूबाई

# कळसुबाई....उंच तिचा धोका

परस्पर विरोधी गुण असलेल्या गोष्टी एकमेकांकडे आकर्षिल्या जातात. शाळेतल्या अभ्यासक्रमात शिकलो होतो धन प्रभारातून ऋण प्रभाराकडे वीज वाहत जाते. उच्च दाबातून कमी दाबाच्या पट्टयात वारे वाहतात. चुंबकाचे परस्परविरोधी ध्रुव एकमेकांकडे आकर्षिले जातात. गावातून शहराकडे कामधंद्यासाठी आणि शहरातून गावाकडे आनंदासाठी लोक आकर्षित होतात. कमी उंचीवर राहणाऱ्यांना कधीकधी उंचावर जावेसे वाटते. म्हणून ठिकाण ठरवले..... महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर .......कळसुबाई .





शेवटची ‘कसारा’ लोकल पकडण्यासाठी आदल्या दिवशीच निघून नंतर एक्स्प्रेसने इगतपुरी गाठली. पहाटे इगतपुरी स्थानकापासून पहिली बस निघाली आणि अर्ध्या तासात ‘बारी’ गावात आलो. खरंतर कंडक्टरने जागं केलं आणि उतरवलंही. जवळच्या दुकानात उत्कृष्ट चहा आणि उत्कृष्ट पोहे हादडले. जेवणासाठी चपात्या आणि पिठलं भाकरी सोबत घेतले. इतक्या वेळात कळसुबाईचं सौंदर्य डोळ्यात साठवून घेत होतो.



तिच्यात-आमच्यात फ़क्त काही क्षणाचंच अंतर...... पायाजवळ वळण घेणारं पाणी म्हणजे जणू पायातलं पैंजण.... त्या पैंजणांचा आवाज इथपर्यंत येत होता. दुडूदुडू धावत शेतामधून खेळत पाणी रस्त्यापर्यंत येत होते. गावातील लहान मुले वाटाड्या (गाईड) हवा का ? अशी आग्रहवजा विचारपूस करत होते; पण आमच्यासोबत अनुभवी होते.

साहित्य प्रतिष्ठान





रस्त्यावरच्या कमानीतून आत शिरलो. सिमेंटच्या रस्त्यावरून कधी मातकट रस्त्यावर आलो कळलेही नाही. दोन्ही बाजूंना असलेले हिरवेगार शेत; आणि शेताशेजारून जाणारे, कधी फेसाळणारे तर कधी शांत पाणी मन मोहून टाकते. सुरुवातीला गावात कुठून शिरायचे हे कळत नाही असे आमच्या चेहऱ्यावरून समजताच गावकऱ्यांनीही आम्हाला योग्य मार्ग दाखवला.

चिखलाला आता बुटांचे आकर्षण वाटू लागले. त्यावर पाय ठेवल्यावर ‘पचपच’ आवाज येऊ लागला. वाटेतच मोठ्या शिळांनी बांध घातल्यामुळे कमी अधिक उंचीचे धबधबे तयार झाले आहेत. या धरणाच्या आतून पाण्यातून चालण्याशिवाय पर्याय नाही. शिवाय बूट काय आतले सॉक्स, कपडेही धुवून निघतात. हे सर्व करताना आपण ठराविक उंचीदेखील गाठतो. घसरून पडलोच तर हिरव्या शेतात पडल्याचे सुख(?).





उतारावर मोठ्या रुंदीच्या पायऱ्या बनवून केलेली शेती दिसते. त्यामुळेही बरेच पाणी अडवलेले दिसते. चिखलातून, आडव्या पडलेल्या मोठ्या ओंड्क्यावरून चालताना, घसरताना सावरण्याचा सराव होतो जो पुढे कामी येतो.

सभोवतालच्या मांडून ठेवलेल्या वेगवेगळ्या रंगाच्या हिरव्या साड्या बाईंना शोभून दिसतात. साड्यांना कधी फेसाळणाऱ्या पाण्याची आणि बांधलेल्या दगडांची काळी किनार कळसुबाईंचे मन प्रसन्न करते.

थोड्या रुंद जागेतून दोन्ही बाजूला व्यवस्थित झाडे असलेल्या मार्गातून काही वेळातच आपण एका पठारावर पोहोचतो. त्याचा उतार इतका तीव्र नाही पण त्याच्या किनाऱ्यावरून सभोवतालचे दृश्य डोळ्यात साठवून ठेवावे असेच आहे.

चहूकडे हिरवीगार शेते, सभोवतालचे अनेक डोंगर  कळसुबाईकडेच पाहत आहेत. त्यांनी पाहू नये म्हणून वारंवार बाष्प मध्येच आडवं येत होतं. श्रावण महिना असल्यामुळे उन्हात अधूनमधून कळसुबाईच्या मुखाचे दर्शन होत होते; पण वारंवार  तीदेखील धुक्याच्या पदरामागे स्वतःला झाकून घेत होती.

धुक्याचे प्रमाण इतके की शेतात बनवलेल्या वाफांमागून जणू वाफा बाहेर पडत आहेत असे वाटते. याच पठारावरून उंचापर्यंत जाणाऱ्या शिड्या दिसल्या. लांबूनच त्या संख्येने जास्त दिसत होत्या.







साहित्य प्रतिष्ठान



पठाराच्या पायवाटेवरून चालत राहून जंगलात शिरलो. अगदी माणसाप्रमाणे शीळ घालणाऱ्या पक्ष्यांचा आवाज सुमधुर वाटला. त्यामुळे एकमेकांशी संवाद करून स्वतःचा आवाज त्यांना ऐकवण्यात काहीच अर्थ नसतो. शांत जागेतून पुन्हा एकदा थोड्या कमी उताराची अरुंद जागा आहे.



उजवीकडे जाणारा निमुळता भाग किल्ल्याच्या माचीप्रमाणे! काही ठिकाणी कडेला लोखंडी दांडे रोवून सुरक्षेची काळजी घेतलेली दिसते. पूर्ण प्रवासात गावातले अनेक तरुण आणि लहान मुले-मुली चहा, सरबत वगैरेचा व्यवसाय करताना दिसतात.

ई साहित्य प्रतिष्ठान





धबधब्यांच्या आजूबाजूला काही गुहा दिसतात. तिथपर्यंत पोहोचायचा मार्ग मात्र दिसत नाही. मागे वळून पाहिल्यास लांबपर्यंत ओढ्याचे पाणी वाहताना दिसते. सिमेंटचा चकाकणारा रस्ता आणि संथ वाहणारे पाणी यातला फरकही कळत नाही. सगळा निसर्ग पुढे जाऊन धुक्यामध्ये हरवतो आणि आपण पुढे जाऊन शिड्यांजवळ येऊन थांबतो.





शिड्यांचा डोंगरांशी असलेला कोन थोडा घाबरवणारा आहे. लोखंडाच्या शिडीच्या पायऱ्या, आधारासाठी लोखंडी पाईप किंवा सळई ,शिडी वाकली जाऊ नये म्हणून दगड-माती आणि शिडीला जोडणारे लोखंडी दांडे हे काम खरोखर स्तुत्य आहे. शिडी रुंद असली तरी पाय ठेवण्यासाठी वापरलेले लोखंडी साहित्य कमी व योग्य आकाराचे आहेत. यापेक्षा जास्त आकाराचे सामान वापरल्यास शिडीचेही वजन वाढले असते. अधूनमधून शिडीवर अनेकजण एकाचवेळी चढताना-उतरताना दिसले.



असे असले तरी शक्यतो एका वेळी एक किंवा दोन जणांनीच चढावे. एक शिडी चढून वळण घेतल्यानंतर पुन्हा दुसरी शिडी चढताना मागची शिडी दिसेनाशी होते. शिवाय जास्त काळ उभे राहता न आल्याने उंचावर जाणे चालूच राहते. शिडीच्या खाली दिसणारी वाट कधी सोपी तर कधी कठीण वाटते....पण ती शिडीवर उभी राहूनच. पाणी पिण्याची इच्छा झाली तरी जमिनीवरून वाहणारे स्वच्छं पाणी पिता येत नाही. ओल्या, थंड, शिडीचा आधार घेत चालले की हात थंड होतात.

साहित्य प्रतिष्ठान





वाटेत थांबल्यास मच्छर आपले गालगुच्चे घेऊन जातात. एक किटक हाताला अर्धा मिलीमीटर आकाराचा दंश करून गेल्याने माझ्या हातावर किमान पंधरा सेमी जागेवर सुज आली. ट्रेकिंगसाठी येताना आपले अंग शक्यतो झाकलेले असावे.

अधूनमधून शिडीच्या बाजूला मोकळ्या जागेत उभे राहण्याचे धाडस केल्यास निसर्गसौंदर्य भुरळ पाडते आणि तेच तेच दृश्य पुनःपुन्हा जास्त उंचीवरून पाहण्यासाठी प्रोत्साहन देते. पुढे सरळ रेषेत एकमेकांना नट-बोल्टने जोडलेल्या चार पाच शिड्या उंचावर पोहोचण्यास मदत करतात. सर्व शिड्यांवर चढून झाल्यानंतर एक मोठा टप्पा पार पडल्याचा आनंद मिळतो.

ई साहित्य प्रतिष्ठान



पुढे काही पायऱ्या आहेत त्यावरूनही पाणी आनंदाने ओसंडून वाहत असते. उजवीकडे सपाट जागेवर दिसणाऱ्या वाटेवर हळूच पाय वळतात; कारण अजून माथा गाठायचा होता. इथे निळ्या रंगाची फुले दाटीवाटीने दिसतात, तर काही रोपटी एकत्रित येऊन घुमटाकार केल्याचे आढळते.











पुन्हा काही झऱ्यामधल्या स्वच्छ पाण्यातून वाट काढत एका विहिरीजवळ आलो. या छोट्याशा ‘कळशी’तले पाणी अत्यंत गोड आहे. विहिरीजवळच असलेल्या दुकानात चहा-भजीचा आस्वाद जरूर घ्यावा. आम्हीही तेथेच जेवून पाठीवरचे काही वजन पोटात घेतले.

थोड्या वेळासाठी धुके बाजूला सरले आणि पूर्ण प्रवासात प्रथमच शिखराचे दर्शन झाले. आणि लगेचच नव्या जोमाने तयार झालो. धुके बाजूला झाल्यावर जास्तीतजास्त निसर्गसौंदर्य पाहता येईल असे वाटल्याने वेग वाढवला. स्पर्धा प्रत्यक्षात धुक्या बरोबरच होती. पायऱ्या चढू लागलो. एका बाजूला पाणी अडवण्यासाठी खोदून ठेवलेले दिसते; तर उजवीकडे भरपूर पायऱ्या..... पायऱ्यांच्या उजवीकडे निळ्या रंगाची भरपूर छोटी फुले कळसुबाईच्या अंगणात!



साहित्य प्रतिष्ठान



लोखंडी दांड्याचा  आधार घेत मोठ्या शिडीजवळ आलो. ही शिडी चढताना आपण सावध आणि एकाग्र होऊन जातो. एकेक करून अशा किमान चाळीस पायऱ्या चढाव्या लागतात. खरंतर कितीही ठरवलं तरी काही पायऱ्या मोजल्या नंतर आपण 'मोजा'यचे विसरुन जातो ही 'मौजे'ची गोष्ट !



आता थोडे चालल्यानंतर आपण अगदी कळसुबाईच्या कळसावर येऊन थांबतो. इथला सोसाट्याचा वारा डोक्यावरची टोपी पळवू पाहत होता. उंचावर बांधलेले मंदिर फारच भक्कम असावे. मंदिरात तीन ते चारच जण बसू शकतात. मंदिराबाहेर काही शिल्पे व त्रिशूळ आहे. मंदिराच्या मागील बाजूस मोकळ्या जागेत कडेला लोखंडी कुंपण घातले आहे जे आवश्यकतेनुसार फारच मजबूत आहे पण तरीही जोराच्या वाऱ्यामुळे ते खणखणू लागले. खालून येणाऱ्या वाऱ्याचा झोत उंचावर वेगाने वाहू लागतो.



वाऱ्याचा हा वेग आपण महाराष्ट्रातल्या सर्वात उंच ठिकाणी आहोत याचा अनुभव देते. आजूबाजूचे निसर्गसौंदर्य 'स्पेशल इफेक्टस'द्वारे धुके दाखवते. ते पूर्णपणे बाजूला होण्याची वाट बघण्यात अर्थ नाही. हे जाणवल्याने शिड्यांवरून उतरण्यास सुरुवात केली.

साहित्य प्रतिष्ठान



शिडीवरून उतरताना चढण्यापेक्षा जास्त वेळ लागतो. प्रत्येक पाऊल साभाळून ठेवताना पडण्याची भीती!.. पण एका सुंदर झाडीत अडकुनही पडू हा छुपा आनंद! कळसुबाईच्या कुशीतून शिड्याद्वारे तिचाच हात धरत धरत पठारापर्यंत आलो आणि पुन्हा एकदा चिखलातून वाट काढत गावापर्यंत. धबधब्याच्या पाण्यात अगदी मनमुराद आनंद घेऊन बाईंचा निरोप घेतला. धुक्याच्या पदर डोक्यावरच आणि मोठे मोठे धबधबे डोळ्यातल्या अश्रूप्रमाणे !

सर्वात उंच असलेल्या शिखराला स्त्रीचे नाव!... ....कळसुबाईला शाल देऊन स्त्रीचा गौरव केल्यासारखा ! आणि ओंजळीतून वाहणारे अनेक झरे-धबधबे म्हणजे तिचे अनेक आशीर्वाद........

# भारतातच नव्हे तर जगात महाराष्ट्राइतका श्रीमंत प्रदेश नसेल.

आमचं हे म्हणणं लोकांना अतिशयोक्त वाटेल किंवा विनोदी. पण दोन हजार वर्षांपुर्वी मराठवाड्यात फ़िरलेल्या एका ग्रीक प्रवाशाने असं लिहून ठेवलंय. जगात त्याला कुठेही एवढी सुबत्ता दिसली नाही.

पण या ठिकाणी मात्र आम्ही हे म्हणतो आहोत ते महाराष्ट्राच्य्या गडकोटांच्या आणि निसर्ग सौंदर्याच्या संदर्भात. गडकोट हे महाराष्ट्राचं वैभव आहे. स्क्वेअर फ़ूटांच्या हिशेबात किंमत नका करू. किंवा टुरिस्ट फ़ुट फ़ॉलचाही हिशेब नका करू. प्रदेशाची श्रीमंती त्याच्या परंपरा, त्याच्या इतिहासाच्या संदर्भात पहायला हवी. या गडकोटांनी मराठीच नव्हे तर कोणत्याही मनाला जी उभारी मिळते त्यात त्यांची किंमत होते. या गडांच्या नुसत्या दर्शनाने स्फ़ुर्ती येते. या गडांची नुसती माहिती वाचताना छाती गर्वाने फ़ुगते. हेच तर खरे वैभव. मराठी भाषा, गड कोट, निसर्ग, लेणी अशा वैभवशाली प्रदेशात जन्म घेण्याचं भाग्य आपल्याला लाभलं.

ई साहित्य प्रतिष्ठानने महाराष्ट्रातल्या सर्व गडकिल्ल्यांची माहिती एकेका स्वतंत्र ई पुस्तिकेत जमा करण्याचा निर्धार केलेला आहे. “दुर्ग दुर्घट भारी,’ ’ट्रेकिंगिरी’, ’त्या सुंदर यात्रेसाठी’ अशा मालिकांद्वारे या पुस्तिकांची निर्मिती चालू आहे.

आपण या प्रकल्पात सहभागी व्हा. आपल्याकडची माहिती, फ़ोटो, लिखाण आम्हाला पाठवा. आपल्या मित्रांचे ई मेल पत्ते कळवा. काही तरी भव्य दिव्य करूया. आपल्याही पिढीला सांगण्यासारखं काही हवं ना !

esahity@gmail.com www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाराष्ट्रातील किल्ले

- अंकाई
- अंजनवेल
- अंजनेरी
- अंमळनेरचा किल्ला
- अचलगड
- अजिंक्यतारा
- अर्नाळा
- अलंग
- अलिबाग
- अवचितगड
- अशीरगड
- असावगड
- अहमदनगरचाभुईकोट किल्ला
- अहिवंत
- आंबोळगड
- आमनेरचा किल्ला
- आवर किल्ला
- इंद्रगड
- इंद्राई
- उंदेरी
- उंबरगांव
- उमरेडचा किल्ला
- कंक्राळा
- कंचना
- कनकदुर्ग
- कन्हेरगड
- कन्हेरा
- कमालगड
- कर्नाळा
- कर्हेगड
- कल्याणगड
- कल्याणचा किल्ला
- कामनदुर्ग
- काळदुर्ग
- कावनई
- किल्ले चंद्रपूर
- कुडाळचा किल्ला
- कुलंग
- कुलाबा
- कुवारी
- केंजळगड
- केळवे-माहीम
- कोंजकिल्ला
- कोट कामते
- कोथळीगड (पेठचा किल्ला)
- कोरलई
- कोळधेर
- कौला किल्ला
- खांदेरी
- खारेपाटण
- गाळणा
- गुणवंतगड
- गुमतारा
- गोंड राजाचा किल्ला
- गोंदियाचा प्रतापगड
- गोरखगड
- गोवळकोट
- गोवा
- घारगड
- घोसाळगड

# ...किल्ले (पुढे चालू)

- चंदन
- चंदेरी
- चांदोर
- चाकण
- जंगली जयगड
- जयगड
- जवळया
- जीवधन
- टंकाई
- टकमक
- ठाणे किल्ला
- डहाणू
- तळेगड
- तांदुळवाडी किल्ला
- तारापूर
- तिकोना
- तुंग
- तुंगी
- तेरदाळ
- त्रिंगलवाडी
- त्रिंबक
- दातिवरे
- दिंडू
- दुर्ग रत्नागिरी
- देवगड
- देवगिरी-दौलताबाद
- दोदवाड
- धक
- धारावी
- धैर
- धोडप
- नगरधन(रामटेक)(भुईकोट
- नळदुर्ग
- नांदोशी
- नारायणगड
- निवती
- पट्टा
- पन्हाळा
- पांडवगड
- पारसिक
- पारोळयाचा किल्ला
- पावनगड
- पुरंदर
- पूर्णगड
- पेडगावचा बहादूरगड
- पेब
- प्रचंडगड (तोरणा)
- प्रचितगड
- प्रतापगड
- प्रबळगड
- फत्तेगड
- बल्लारशा
- बल्लाळगड
- बळवंतगड
- बहादरपूर किल्ला
- बहिरवगड
- बहुळा
- बांदे

# किल्ले...

- बाणकोट
- बावडा
- बिरवाडी
- बेलापूर
- ब्रह्मगिरी
- भगवंतगड
- भरतगड
- भवनगड
- भास्करगड
- भिवगड
- भूधरगड
- भूषणगड
- भैरवगड
- भोपटगड
- भोपाळगड
- मंगळगड-कांगोरी
- मंगळवेढे
- मंडणगड
- मकरंदगड
- मच्छिंद्रगड
- मनोहरगड
- मलंगगड
- मल्हारगड
- महादेवगड
- महिपतगड
- महिमंडणगड
- महिमानगड
- माणिकगड
- मानगड
- मानोर
- मार्किंडा
- माहुली
- मुल्हेर
- यशवंतगड
- येलवट्टी
- रतनगड
- रवळ्या
- रसाळगड
- रांगणा
- राजगड
- राजधेर
- राजमाची
- राजापूरचा किल्ला
- रामसेज
- रायगड
- लिंगाणा
- लोहगड
- वंदन
- वर्धनगड
- वसंतगड
- वसईचा किल्ला
- वाघेरा
- विचित्रगड
- विजयगड
- विजयदुर्ग-घेरिय ा
- वितानगड

# किल्ले...

- विशाळगड
- विश्रामगड
- विसापूर
- वेताळगड
- वैराटगड
- वरसोवा
- शिरगांवचा किल्ला
- शिरहट्टी
- शिवनेरी
- श्रीमंतगड
- संजान
- संतोषगड
- सज्जनगड
- सदाशिवगड
- सर्जेकोट
- सांकशी
- सांगली
- सागरगड
- साठवली

- सामानगड
- सावंतवाडीचा किल्ला
- सिंधुदुर्ग
- सिंहगड
- सिताबर्डीचा किल्ला
- सिद्धगड
- सुंदरगड
- सुमारगड
- सुरगड
- सुवर्णदुर्ग
- सेगवाह
- सोनगिरी
- हडसर
- हर्षगड
- हातगड
- गंभीरगड
- चावंड
- पालगड
- भवनगड

- मनसंतोषगड
- वारुगड

- तशी ही यादी अजून बरीच मोठी होईल. आपण यातील कोणत्याही किल्ल्याला भेट दिली असेल, त्याची माहिती, इतिहास तुमयाकडे असेल, त्याचे फ़ोटो, नकाशे असतील, तर ते आम्हाला पाठवा.
- माहिती वद फ़ाईल, मेल, ppt किंवा ब्लॉगची लिंक अशा पद्धतींनी पाठवू शकता.


- पत्ता : esahity@gmail.com

सळसळत्या तरुणाईला आव्हानं नेहमी खुणावत असतात आणि त्यातलं कुठलं आव्हान आपण पचवू शकू. याचा अंदाज येत असतानाच एखाद्या गाफिल क्षणी त्याला काही तरी गवसतं. तो त्याच्या नादी लागतो. त्याचं रुपांतर छंदात होतं. मग छंद अंगवळणी पडतो आणि त्याची झिंग चढते. या कैफातच मग तो आव्हान स्वीकारतो. म्हणजेच पर्यायाने तो चाकोरीबाहेरच्या एका नव्या वळणावर आसुसलेपणाने उभा असतो. तेव्हा त्याच्या डोळ्यांत एक टप्पा ओलांडल्याचा तृप्त भाव असतो. अशाच, पंकज घारे नाम एका झपाटलेल्या आणि 'कुछ कर के दिखाना है' वृत्ती अंगी बाणलेल्या बांड तरुणाचा हा प्रथम हुंकार आहे. गिर्यारोहणासारखा थरारक छंद जोपासणे म्हणजे खरे तर एक धाडसच आहे. त्यामुळे हिमालयाची शिखरे साद घालत असल्याचे त्याला प्रकर्षाने जाणवले व आपल्या निवडक सवंगड्यांसमवेत त्या गिरीशिखरांना गवसणी घालण्याचा बेत त्याने आखला आणि तो तडीसही नेला. त्याचीच ही कूळकथा म्हणजे 'पहिले पाऊल'. त्याने स्वतःच म्हटल्याप्रमाणे हे 'प्रवासमंथन' आहे. प्रवासवर्णन नव्हे. त्याची प्रचीती पानोपानी येते.

पंकजची स्वतःची अशी लेखनशैली आहे, त्याकडे चौफेर दृष्टी आहे, प्रांजळपणा आहे, विनोदीबुद्धी आहे, निसर्गाची ओढ आहे, प्राण्यांविषयीची कणव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे भाबडेपणाही आहे. त्यामुळे हिमशिखरांवरुन अलगदपणे भांडुपच्या घरातल्या आपल्या आईशी तो हितगुज करतो (नेटवर्क नसतानासुद्धा). प्रवासातल्यसा गमती-जमती, वाटेत आलेल्या अनंत अडचणी, हवामानातील टोकाचा बदल आणि गिर्यारोहणकाळातील 'कमांडो' वजा जीवन याचं जिवंत चित्रण पंकज करु शकला आहे. त्यामुळे, त्याचे हे 'पहिले पाऊल' ज्ञानदेवाच्या ओवीसारखे एकदा तरी अनुभवावे असेच आहे. त्याचे हे पाऊल उंबऱ्यावरचे माप ओलांडून गृहप्रवेश करु इच्छित आहे. आपण त्याचे स्वागत करु या.

**प्रकाश भातम्ब्रेकर**

संवेदना प्रकाशन






पंकज घारे
लेखक: पहिले पाऊल
संपर्क: ९८१९ ६६३ ६३०


- 'पहिले पाऊल' हे प्रवासमंथन मनाला आणि प्रत्यक्षात देहालाही उंच प्रवास करण्याचे सामर्थ्य दर्शविते. वास्तववादी सत्य वाचताना आपले मनही त्या प्रवासात रममाण होते.

  – मारुती म्हात्रे (संचालक, अमरकोर विद्यालय)

- पंकजची चौकस बुद्धी आणि मोकळं मन, सामोरा येणारा प्रत्येक अनुभव समृद्ध करून जातो. धाडस, चिकाटी, सहनशीलता, सहकार्य अशा अनेक गुणांचे संस्कार देतात.

  – हेमंत कर्णिक (ज्येष्ठ पत्रकार)

- हिमालयीन उंची गाठणाऱ्या पंकजचे साहसानुभव वाचणं ही पर्वणीच आहे. 'पहिले पाऊल'चं वाचन स्वान्तसुखाय रानावनात मनसोक्त भटकण्यासारखं आहे.

  – सुधीर सुखठणकर (सुप्रसिद्ध विनोदी लेखक)

- 'पहिले पाऊल'मधून गड-किल्ल्यांचा अभिमानी मराठी माणूस व्यक्त होतो. निश्चयाला भिडलेल्या तरुणांना या पुस्तकातून बरंच काही मिळेल.

  – सुनंदा अमरापूरकर (सुप्रसिद्ध लेखिका)

- प्रवासमंथन; आपणही हा अनुभव घ्यायला काय हरकत आहे, असं वाटणं हेच लेखकाचं सारं यश आहे.

  – प्र. के. घाणेकर (सुप्रसिद्ध लेखक)

- 'आधी थोड्या गप्पा मारूया' हे मनोगत वाचल्यास हे 'तिकीट' वाचकाला लेखकासोबत घेऊन जाते. अपघातानंतर दिल्ली पर्यटनाचे खुमासदार वर्णन लाजवाबच!

  – आनंद पाळंदे (सुप्रसिद्ध लेखक)

- साहस, स्वावलंबन, धैर्य, स्थान, संयम व शिस्त यांची शिकवण देणाऱ्या पदभ्रमण छंदात 'पहिले पाऊल'मुळे सहभागी होण्याची प्रेरणा मिळते.

  – विवेक खोले (कॅम्प लीडर, यूथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया)

